अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १६ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## रोहीत पर्वाचा अस्त; हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सचा कर्णधार

**मुंबई :** मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदाची धुरा हार्दिक पांड्याच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. हार्दिक पांड्याला १५ कोटी रुपयांमध्ये मुंबईने गुजरात संघाकडून ट्रेड केले होते. त्यानंतर हार्दिक पांड्या कर्णधार होणार.. अशी चर्चा होती. पण आता मुंबईने यावर अधिकृत माहिती दिली आहे.

२०१३ पासून रोहित शर्माने मुंबईच्या कर्णधारपदाची धुरा संभाळली होती. रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबईने पाच वेळा आयपीएलचं जेतेपद पटकावले होते. मुंबई इंडियन्सकडून हार्दिक पांड्याने २०१५ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले. मुंबईने दिलेल्या संधीचे हार्दिक पांड्याने सोने केले. गोलंदाजी आणि फलंदाजीत त्याने शानदार कामगिरी केली. आयपीएलमधील शानदार कामगिरीच्या जोरावर हार्दिक पांड्याला टीम इंडियातही संधी मिळाली. त्याने ही संधी दोन्ही हातानी घेतली. मागील काही



महिन्यापासून हार्दिक पांड्या टीम इंडियाचा महत्वाचा खेळाडू आहे. त्याच्याकडे भारतीय टी २० संघाची धुराही दिली जातेय.

रोहित शर्मा मागील आयपीएलपासून एकही टी २० सामना खेळला नाही. गतवर्षी रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबईला लौकिकास साजेशी कामगिरी करता आली नाही. त्यामुळेच मुंबईने भविष्याचा विचार करत हार्दिक पांड्याकडे संघाची धुरा दिल्याचे बोलले जाते.

# संक्रांत कुणाला भोवणार? शिंदे की ठाकरे गटाला!

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**


**दरवर्षी येणारी मकर संक्रात कोणत्या दिशेने येते आणि कुठल्या दिशेने जाते? तिने कुठले कपडे परिधान केले आहे आणि तिने काय खाल्ले आहे? याविषयीची मोठी उत्सुकता असते. मात्र, यंदाची संक्रात कुणाला भोवणार? ठाकरे गटाला की शिंदे गटाला? हा एक यक्षप्रश्न राज्यापुढे आला आहे. आमदार अपात्र प्रकरणी शुक्रवारच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने सभापती राहुल नार्वेकर यांना १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह १६ आमदारांच्या राजकीय भवितव्याचा फैसला संक्रांतीपूर्वीच होणार असल्याने राजकीय क्षेत्रात उत्सुकता शिगेला पोहचली आहे. त्यासाठी तब्बल २५ दिवसांची वाट पहावी लागणार आहे.**

शिवसेना आमदार अपात्रता सुनावणीत मुदत वाढवून देण्याच्या विधिमंडळाच्या मागणीवर सुप्रीम कोर्टाने वेळ वाढवून दिली. अपात्रता सुनावणीसाठी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ठाकरे गटाला धक्का बसला आहे. ३१ डिसेंबर पूर्वी निर्णय करण्याचे निर्देश कोर्टाने या अगोदरच्या सुनावणीत विधानसभा अध्यक्षांना दिले होते.या मुदतीपर्यंत निर्णय न दिल्यास आम्हाला आदेश द्यावे लागतील, अशा इशाराही कोर्टाने दिला होता. मात्र, निकाल लेखनाला लागणारा वेळ लक्षात घेता वेळ वाढवून द्या, अशी मागणी अध्यक्षांनी केली होती. त्यावर



सुप्रीम कोर्टाने तीन आठवड्यांचा वेळ न देता १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल देण्याचे नार्वेकरांच्या वकिलांनी मान्य केले आहे. विधानसभा अध्यक्षांच्या वतीने तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निर्णय १० जानेवारीपर्यंत येईल, असे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३१ जानेवारी पर्यंतच्या निर्णयावर कोणतेही भाष्य केलेले नाही. १० जानेवारी किंवा १० जानेवारीच्या आत शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी निर्णय येणार आहे. शिवसेना संदर्भातील निर्णय घेण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना १० जानेवारी ही डेडलाईन दिली आहे.

## मुदतवाढ मिळवण्यात नार्वेकर अखेर यशस्वी ठरले



### मुंबई, नागपूरमध्ये झाली सुनावणी

राहुल नार्वेकर यांच्याकडून सुप्रीम कोर्टात यापूर्वी झालेल्या सुनावणीत शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रता प्रकरणाचा निकाल लावण्यासाठी ३१ जानेवारीची मुदत मागण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं ३१ डिसेंबरची मुदत दिली होती. यानंतर राहुल नार्वेकर यांनी मुंबईत आणि नंतर हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यानंतर नागपूरमध्ये सुनावणी घेतली होती. यामध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीनं जोरदार युक्तिवाद करण्यात आला होता.१८ डिसेंबरपासून नार्वेकर हे पुन्हा सुनावणी घेणार असल्याचे सांगण्यात आले.

### काय झाले कोर्टात?

- **तुषार मेहता :** सकाळपासून विधानसभेचे कामकाज सुरू होईपर्यंत आणि त्यानंतर संध्याकाळपासून ते रात्रीपर्यंत अध्यक्षांनी सुनावणी घेण्याचा प्रयत्न केला आहे. २८ डिसेंबर २०२३ पर्यंत सुनावणी पूर्ण होईल यात शंका नाही . विधानसभा अध्यक्षांना निवाडा करायला वेळ द्यायला हवा
- **सरन्यायाधीश :** अध्यक्ष सुनावणी पूर्ण करत आहेत त्यांना आदेश लिहायला आपण वाजवी वेळ द्यायला हवा. Reasonable time म्हणजे किती असावा तुम्ही सांगा
- **सरन्यायाधीश :** आम्ही १० जानेवारीपर्यंत वेळ वाढवून देत आहोत. अध्यक्षांना आदेश देण्यासाठी १० जानेवारीपर्यंत वेळ वाढवून देत आहे.

### एक हजारांहून अधिक प्रश्नांच्या उत्तराचे वाचन करण्याचे आव्हान

विधानसभेत अपात्रता प्रकरणी अंतिम सुनावणी १८ डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे. अंतिम सुनावणी १८ ते २० डिसेंबर या तीन दिवसांत पूर्ण होणार आहे. २१ ते ३१ डिसेंबर कालावधीत निकालाचे लेखन अशक्य आहे. निकालाचे लेखन करण्यासाठी मात्र अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे. एक हजारांहून अधिक प्रश्नांच्या उत्तराचे वाचन करण्याचे आवाहन विधीमंडळासमोर आहे. नागपूरवरून मुंबईत कागदपत्रे नेण्यासाठी ही वेळ लागणार आहे. परिणामी या पार्श्वभूमीवर निकाल लावण्यासाठी अधिक वेळेची मागणी करण्यात आली होती.

## यापुढे राज्यात शिक्षकांच्या नियमित बदल्या होणार नाहीत : केसरकर

**नागपूर :** शिक्षक भरती संदर्भात शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेचा दर्जा वाढवण्यासाठी राज्यात यापुढे जिल्हा परिषदच्या शिक्षकांच्या बदल्या होणार नाहीत, असं दीपक केसरकर म्हणाले.



शिक्षक एकदा शाळेवर नियुक्त झाला तर निवृत्ती पर्यंत एकाच शाळेवर राहण्याची मुभा यापुढे शिक्षकांना असणार असल्याची माहिती देखील त्यांनी यावेळी दिलीये. येत्या २० डिसेंबरपासून राज्यात शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. तसेच निवडणूक आयोग आणि जनगणना व्यतिरिक्त इतर कोणतीही शासकीय कामं शिक्षकांना विभागाच्या परवानगीशिवाय देता येणार नाही, असं स्पष्टपणे केसरकरांनी सांगितलं आहे. जिल्हा परिषदच्या शाळा बंद करणे हे राज्य सरकारचे धोरण नाही. एक विद्यार्थी असेल तरीही शिक्षक मिळेल. जेथे प्रवासाचा प्रश्न असेल त्या विद्यार्थ्याला शाळेत पोहवणे ही शालेय शिक्षण विभागाची जबाबदारी असणार असल्याचं केसरकरांनी म्हटलं.

## अपघातात जखमी मोटरसायकलस्वाराचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर**

अज्ञात वाहनाच्या धडकेने गंभीर जखमी झालेल्या मोटारसायकल स्वाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला.

शिरू फतरू सय्यद (वय-२८, धारूर, धाराशिव) असे मृत मोटारसायकलस्वाराचे नाव आहे. दि.१२ डिसेंबर रोजी दुपारी शिरु, त्याचा भाऊ दोघे मोटारसायकलवरून गॅस आणण्यासाठी निघाले असता परांडा रोडवरील गॅस गोदामासमोर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली होती. यामध्ये शिरू सय्यद हा मार लागून गंभीर जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी बार्शीतील जगदाळेमामा हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला येथील शासकीय रुग्णालयात शुक्रवारी दुपारी भाऊ फिरोज यांनी दाखल केले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## जीएसटी वसुलीत महाराष्ट्राचा टॉप गिअर

### आठ महिन्यात घसघशीत महसूल

**सुराज्य/मुंबई**

देशाच्या महसूल उत्पन्नात अतिशय महत्त्वाचा घटक असलेल्या 'जीएसटी'च्या वसुलीत महाराष्ट्राने मोठी आघाडी घेतली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ महिन्यांत तब्बल अठरा टक्के वाढ झाली आहे. नोव्हेंबर अखेर राज्यात २ लाख ११ हजार ५६३ कोटी रुपयांची वसुली झाल्याने राज्याला निधी रूपाने मोठी गंगाजळी मिळण्याची अपेक्षा आहे.



देशात महसूल वाढीसाठी जीएसटी ही करप्रणाली सुरू करण्यात आली. तेव्हापासून त्याच्या वसुलीत राज्याने समाधानकारक कामगिरी केली आहे. या आर्थिक वर्षात नोव्हेंबर महिनाही जीएसटी महसुलासाठी चांगला ठरला. यंदा संकलनात चांगली वाढ असून, नोव्हेंबरमध्ये २५ हजार ५८५ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. गेल्या वर्षी हा आकडा २१ हजार ६११ कोटी रुपये होता. या पार्श्वभूमीवर यंदा नोव्हेंबर महिन्यात गेल्या वर्षीपेक्षा जीएसटी महसुलात ३ हजार ९७४ कोटी रुपयांची म्हणजे १८ टक्के वाढ झाली आहे. गेल्या आठ महिन्यांचा आढावा घेतल्यास एप्रिल ते नोव्हेंबरचा महसूल दोन लाख ११ हजार ५६३ कोटी रुपये इतका झाला. मागील वर्षी हे संकलन एक लाख ७८ हजार ४७१ कोटी रुपये होते. या पार्श्वभूमीवर आठ महिन्यांत जीएसटी महसुलात ३३,०९२ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. राज्यात चांगला महसूल वसूल झाल्याने केंद्राकडून अधिक गंगाजळी मिळण्याची अपेक्षा आहे.

## सोलापूर बाजार समितीत १५०० गाड्या कांद्याची आवक

**सुराज्य/सोलापूर**



सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. कारण, कांद्याच्या दरात सातत्यानं घसरण होत आहे. सरकरनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातल्यानंतर कांद्याचे दर घसरले आहेत. या मुद्यावरुन शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, अशातच सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक झाली आहे.

बाजार समितीत सुमारे १२०० ते १५०० गाडी कांद्याची आवक झाली आहे. या वाढलेल्या आवकेमुळं दरात आणखी घसरण होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्याला हिवाळी अधिवेशना दरम्यान आर्थिक मदत होईल आणि दिलासा मिळेल अशी आशा होती. मात्र, केंद्र सरकारच्या या निर्णयाने शेतकरी वर्गात पुन्हा नाराजी पसरली आहे. अनेक ठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांची आंदोलनं सुरु आहेत. दरम्यान, केंद्र सरकार लवकरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेईल,असे आश्वासन मंत्री पियुष गोयल यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिले आहे. त्यामुळं आता यावर तोडगा निघणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

### आज,उद्या सोलापूर बाजार समिती बंद

सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत सुमारे १२०० ते १५०० गाडी कांद्याची आवाक झाली आहे. अद्यापही अनेक गाड्या रांगेत थांबून आहेत. त्यामुळं आज सकाळी दहा वाजता सुरु होणारे कांद्याचे लिलाव दुपारी दोन वाजता करण्याचा निर्णय व्यापाऱ्यांनी घेतला आहे. तर उद्या शनिवारी बाजार बंद ठेवण्याचा निर्णय बाजार समितीनं घेतला आहे. तर रविवारी साप्ताहिक सुट्टी असल्यानं सलग दोन दिवस बाजार समिती बंद राहणार आहे. आधीच निर्यातबंदीमुळं सोलापूरच्या बाजारात कांद्याचे दर निम्म्याहून अधिक घसरले होते. त्यातच वाढलेल्या आवकेमुळं दरात आणखी घसरण होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सोलापूर बाजार समितीच्या नियोजनाच्या अभावामुळं शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जातेय.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उडणाऱ्या काजळीमुळे आम्ही घराचे डिझाईनच असे करून घेतलंय !

| कल्याण |
| --- |
| 112-48-134 |

| मुंबई |
| --- |
| 479-03-346 |

### ▪ शहरातील दोन धाब्यांवर धाडी; न्यायालयाने ठोठावला ५५ हजारांचा दंड

# दोन हॉटेल चालकांसह ९ मद्यपींविरुद्ध गुन्हे दाखल

**सुराज्य/मंगळवेढा**

**राज्य उत्पादन शुल्क माळशिरस विभागाने गुरुवारी मंगळवेढा शहरातील दोन धाब्यांवर टाकलेल्या धाडीत न्यायालयाने दोन हॉटेल चालकासह नऊ मद्यपी ग्राहकांना ५४ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला. मंगळवेढा–मरवडे रोडवर एका चारचाकी वाहनातून विदेशी दारुच्या वाहतुकीचा गुन्हाही दाखल करण्यात आला.**

गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास माळशिरस विभागाने मंगळवेढा शहरातील हॉटेल जयभवानी या ढाब्यावर छापा टाकला असता ढाबा मालक कुमारदादा सावंत हा ग्राहकांना मद्य पिण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देत असतांना आढळून आल्याने त्याच्यासह ५ मद्यपी ग्राहक समाधान किसन खवणकर, आप्पासाहेब सिद्धेश्वर जाधव, सोमनाथ अशोक जाधव, आप्पा जायप्पा मोरे व सुनील बाबुलाल वर्मा यांना अटक केली.

अन्य एका कारवाईत सांगोला येथील पथकाने मंगळवेढा हद्दीतील हॉटेल भैरवनाथ या ठिकाणी छापा टाकून हॉटेल मालक शुभम सुखदेव जोध व मद्यपी ग्राहक अनिल शेषेराव जाधव, दीपक हरी जाधव, दीपक रामा लोंढे व महेश अरविंद बोरकडे यांना अटक केली. दोन्ही गुन्ह्यातील तपास अधिकाऱ्यांनी एकाच दिवसात तपास पूर्ण



करून न्यायालयात आरोपपत्र सादर केले असता मंगळवेढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस.एन. गंगवाल शाह यांनी हॉटेल मालकांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपये व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी पाचशे रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

**सहा पथकांची नियुक्ती :** नाताळ सण व नविन वर्षाच्या पार्श्वभूमीवर या विभागाकडून सहा पथके नेमण्यात आली असून परराज्यातील दारुच्या अवैध वाहतूकीवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. तसेच ढाबा–हॉटेलच्या अचानकपणे तपासण्या करण्यात येत आहेत. ढाब्यावर दारु विक्री करणे तसेच त्याठिकाणी बसून दारु पिणे कायद्याने गुन्हा आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाया केल्या जातील. ज्या हॉटेल्सना न्यू ईअर पार्ट्यांचे आयोजन करावयाचे आहे त्यांनी त्याठिकाणी मद्याचे वितरण करण्यासाठी या विभागाकडून रीतसर वनडे क्लब लायसन्स घ्यावे, अन्यथा अशा हॉटेल्सचे मालक व आयोजकांविरुद्धही कारवाई करण्यात येईल.

— **नितिन धार्मिक,** अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क

याच पथकाने शुक्रवारी मंगळवेढा-मरवडे रोडवर प्रशांत शंकर भगरे (भोसे) हा त्याच्या मारुती व्हॅन (एम.एच.१३ डी.ई.३४३८) मधून विदेशी दारुची वाहतूक करतांना आढळून आल्याने त्याला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. त्याच्या ताब्यातून विदेशी मद्याच्या १८० मिलीच्या इंपेरियल ब्ल्यू व्हिस्कीच्या ४८ बाटल्या, मॅकडॉवेल नंबर वन व्हिस्कीच्या ४८ बाटल्या व रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या २२ बाटल्या व वाहन असा एकूण एक लाख ४३ हजार ८८४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.